आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ एप्रिल २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठीची अधिसूचना उद्या जारी होणार /एक केंद्रशासित प्रदेश आणि सहा राज्यांमधल्या ५७ लोकसभा मतदारसंघामधे २५ मे रोजी मतदान

- काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा, तर, मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नसल्याचा शरद पवार यांचा आरोप

- पुढचे चार दिवस पश्चिम बंगाल, ओदिशा, बिहार तसंच झारखंडमधे अनेक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- महिला क्रिकेटमधे सिलहट इथं झालेल्या पहिल्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा बांगलादेशावर ४४ धावांनी विजय /तर आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुची गुजरात टायटन्सवर ८ गडी राखून मात

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठीची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. या टप्प्यात सहा राज्यं, आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ५७ लोकसभा मतदारसंघामधे निवडणूक होणार आहे. त्यात दिल्लीतल्या सर्व ७, हरयाणातल्या सर्व १०, उत्तरप्रदेशातल्या १४, बिहार आणि पश्चिम बंगालमधल्या प्रत्येकी ८, ओदिशातल्या ६, आणि झारखंडमधल्या ४ मतदारसंघाचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत ६ मे पर्यंत असून, मतदान २५ मे

रोजी होणार आहे. या टप्प्यानंतर सर्व मतदारसंघामधली मतमोजणी ४ जूनला होईल.

**<><><><>**

राज्यासह देशभरात लोकसभा निवडणुकीचा प्रचार टीपेला पोचला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कर्नाटकात बेळगाव, सिरसी आणि दावणगेरे इथं प्रचारसभांना संबोधित केलं.

काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा आरोप मोदी यांनी बेळगांव इथं बोलताना केला. केंद्र सरकारनं मंजूर केलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती सुधारेल, आपल्या सरकारनं छोट्या शेतकऱ्यांना मदत केली असं ते म्हणाले. भारताला शक्तिशाली बनवण्याची तसंच सुरक्षा आणि विकासाची हमी त्यांनी सिरसी आणि दावणगेरे इथल्या सभांमध्ये दिली. केंद्रसरकारनं राबलेल्या योजनांचा कर्नाटकातल्या जनतेला मोठा लाभ झाल्याचं ते म्हणाले. सत्ताधारी काँग्रेसनं अनुसूचित जाती-जमातींसाठीचा निधी इतर कामांसाठी वळवल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नाही असा आरोप शरद पवार यांनी केला आहे. ते आज अहमदनगर जिल्ह्यात शेवगाव इथं प्रचारसभेत बोलत होते. राज्यातले कांदा उत्पादक अनेक दिवसांपासून निर्यात बंदी उठवण्याची मागणी करत आहेत, मात्र सरकारनं केवळ गुजरातमधल्या शेतकऱ्यांना कांदा निर्यातीची परवानगी दिली अशी टीका त्यांनी केली.

हे सरकार सामान्य नागरिकांच्या प्रश्नाबद्दलही जागरूक नाही, नरेंद्र मोदी यांचा देशाच्या संसदीय लोकशाहीवर विश्वास नाही, त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही होत नाहीत, असा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ओदिशात केंद्रपाडा लोकसभा मतदारसंघातल्या सालीपूर इथं प्रचारसभा घेतली. केंद्रात आपला पक्ष सत्तेत आला तर, बेरोजगार तरुणांसाठी 'पहिली नोकरी पक्की' ही योजना राबवली जाईल असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज उत्तरप्रदेशात मैनपूर इथं प्रचारसभा घेतली. अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणात कोणत्याही पक्षाला बदल करु देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी या सभेत दिली.

शहा यांनी आज कासगंज आणि इटावा जिल्ह्यातही प्रचारसभा घेतल्या. भाजपानं आपल्या जाहीरनाम्यातली सर्व आश्वासनं पूर्ण केल्याचं ते म्हणाले. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बरेलीत दोन ठिकाणी सभा घेतल्या.

समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी संभल जिल्ह्यात प्रचारसभा घेतली. पहिल्या दोन टप्प्यातल्या मतदानातून उत्तर प्रदेशच्या जनतेनं भाजपाला सडेतोड उत्तर दिल्याची टीका त्यांनी केली. आपल्याला आघाडीला जनतेचा पाठिंबा मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांनी आज बरेलीतही प्रचारसभा घेतली.

बसपाचे निवडणूक समन्वयक आकाश आनंद यांनीही सीतापूर जिल्ह्यात पक्षाचा प्रचार केला.

भाजपचे ज्येष्ठ नेते संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज गुजरातमधे आणंद इथल्या प्रचारसभेला संबोधित केलं. बाहेरची कोणतीही शक्ती भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्पासून रोखू शकत नाही असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी उत्तर मुंबईला उत्तम मुंबई बनवण्याचा आपला निर्धार असल्याचं भाजपा नेते पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज बार्शी इथं उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्याला अडचणीत येऊ देणार नाही, असा निर्धार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मणीपूरमधे आऊटर मणीपूर लोकसभा मतदारसंघाअंतर्गत ६ मतदान केंद्रांवर २६ एप्रिलला झालेलं मतदान निवडणूक आयोगानं रददबातल ठरवलं आहे. उखरुल जिल्ह्यातल्या पाच आणि सेनापती जिल्ह्यातल्या एका केंद्राचा यात समावेश आहे. या सर्व मतदान केंद्रांवर फेरमतदान घेण्याचे आदेशही आयोगानं दिले आहेत. येत्या ३० तारखेला सकाळी ७ ते संध्याकाळी ४ या वेळात हे फेरमतदान होईल.

<><><><><>

पुढचे चार दिवस पश्चिम बंगाल, ओदिशा, बिहार तसंच झारखंडमधे अनेक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. त्या व्यतिरिक्त रायलसीमा, अंतर्गत कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश,

तेलंगण, केरळ तसंच उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागात उष्णतेची लाट राहील. येत्या दोन दिवसांत पूर्व भारतातलं कमाल तापमान एक ते दोन अंश सेल्सिअसनं वाढण्याची शक्यता आहे. मात्र त्यानंतर हवामानात विशेष बदल होणार नसल्याचं हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान येत्या बुधवारपासून अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याशिवाय पश्चिम मध्य प्रदेश, विदर्भ आणि छत्तीसगड मध्ये उद्यापर्यंत मेघ गर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

येत्या दोन दिवसात, कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

बांग्लादेशात सिल्हट इथं भारत आणि बांग्लादेश महिला क्रिकेट संघात झालेला पहिला टी ट्वेंटी क्रिकेट सामना भारतानं ४४ धावांनी जिंकला. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतल्यानंतर, भारतानं निर्धारीत २० षटकात ७ बाद १४५ धावा केल्या. भारताच्या वतीनं यास्तिका भाटिया हीनं सर्वाधिक ३६ धावा केल्या.

विजयासाठी १४६ धावांचा पाठलाग करताना, कर्णधार निगार सुलताना हीच्या अर्धशतकी खेळीनंतरही बांग्लादेशाला ८ बाद १०१ धावाच करता आल्या. भारताच्या रेणूका सिंग हीनं तीन बळी घेतले.

पाच सामन्यांच्या या मालिकेतला दुसरा सामना ३० एप्रिलला होणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं गुजरात टायटन्सचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातनं निर्धारित २० षटकात तीन गड्यांच्या मोबदल्यात २०० धावा केल्या. त्यानंतर बंगळुरुनं विल जॅक्स याच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर केवळ १६ षटकांतच विजयासाठीचं २०१ धावांचं लक्ष्य पार केलं.

स्पर्धेतला आजचा दुसरा सामना चेन्नईमधे, चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सुरु आहे. सनरायझर्स हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ८ षटकात १ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

संयुक्त राष्ट्र अमिराती इथं सुरू असलेल्या आशिया ओशनिया झोन ऑलिम्पिक तलवारबाजी पात्रता फेरी २०२४ मध्ये भारताच्या भवानी देवी आणि तनिक्षा खत्री यांनी आज उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

भावनी देवीनं महिलांच्या सेबर प्रकारात सिंगापूरच्या ज्युलिएट जी मिन हेंग हिचा १५-८ असा पराभव केला. महिलांच्या ईपी प्रकारात तनिक्षानं चीनच्या ली हसियांग हंग हिचा १५-१० असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यात या दोघी जिंकल्या तर पॅरिस इथं होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये त्यांना स्थान मिळू शकेल.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या उबेर चषक  बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार खेळ करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.  आज महिलांच्या अ गटातील सामन्यात भारतीय खेळाडूंनी सिंगापूरला ४-१ नं  पराभूत केलं.

महिला एकेरीत अश्मिता छालिहा, इशारानी बरुआ, अनमोल खारब तर दुहेरीत प्रिया कोनजेनबाम आणि श्रुती मिश्रा, तसंच सिमरन सिंघी आणि ऋतिका ठाकरे यांनी चांगला खेळ केला. यामुळे स्पर्धेतल्या अ गटात भारतीय महिला संघ दुसऱ्या स्थानावर असून चीन पहिल्या स्थानावर आहे. गटसाखळीतला अंतीम सामना येत्या मंगळवारी होणार आहे.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><>//